**<u>ठळक बातम्या</u>**

- आजच्या भारताला संपूर्ण जगाशी जोडलं जाण्यात स्वारस्य असून ‘सर्वांसाठी विकास आणि कल्याण’ हेच भारताचं धोरण असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रातल्या शाळांमध्ये विद्यार्थी सुरक्षा समित्या स्थापन करण्यासह विविध उपाययोजना करण्याचा सरकारचा निर्णय

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ‘राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार’ प्रदान, महाराष्ट्रातल्या दोन शास्त्रज्ञांचा गौरव

**आणि**

- १७ वर्षांखालच्या जागतिक कुस्ती स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू रोनक दहियाला कांस्यपदक

**<><><><><><>**

भारतानं गेली अनेक दशकं इतर देशांपासून अंतर राखण्याचं धोरण स्वीकारलं, मात्र आजच्या भारताला संपूर्ण जगाशी जोडलं जाण्यात स्वारस्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पोलंड आणि युक्रेन या दोन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी काल पोलंडमध्ये वॉर्सा इथं पोहोचले. काल रात्री त्यांनी तिथल्या भारतीय समुदायाला संबोधित केलं. ‘सर्वांसाठी विकास आणि कल्याण’ हेच भारताचं धोरण असून, भारताला ‘विश्वबंधु’ म्हणून जगात सन्मान मिळत असल्याचं ते यावेळी म्हणाले. भारत शांततेचा

पुरस्कार करत असून, संघर्ष थांबवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीवर भारताचा विश्वास असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध दृढ करण्यात पोलंडमधल्या भारतीय समुदायानं दिलेल्या योगदानाचा त्यांनी विशेष उल्लेख केला. भारतातल्या पर्यटनाचे ब्रँड अँबॅसेटर होऊन त्यांनी भारताच्या विकास यात्रेत सहभागी व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं. भारत ही लोकशाहीची जननी असून पोलंड बरोबरच्या सामायिक मूल्यांनी दोन्ही देशांना जवळ आणल्याचं ते म्हणाले.

प्रधानमंत्री मोदी आज वॉर्सा इथं पोलंडचे प्रधानमंत्री डोनाल्ड टस्क यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा करतील. दोन्ही नेते यावेळी विविध परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा करतील. आपल्या दौऱ्यात ते पोलंडमधल्या व्यापारी समुदायाशी देखील संवाद साधतील.

आपल्या दोन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदीमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून प्रधानमंत्री मोदी उद्या युक्रेन इथं पोहोचतील. दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध सुरू झाल्यापासून भारताच्या प्रधानमंत्र्यांनी युक्रेनला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे. प्रधानमंत्र्यांच्या या भेटीत दोन्ही नेत्यांच्या भेटीत राजकीय, व्यापार, आर्थिक, गुंतवणूक, शिक्षण, सांस्कृतिक, यासह विविध परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा होईल. प्रधानमंत्री मोदी युक्रेनमधल्या भारतीय समुदायाशी आणि विद्यार्थ्यांशी देखील संवाद साधतील.

**<><><><><><>**

करदात्यांच्या मनात भीतीची भावना निर्माण होऊ नये म्हणून करदात्यांना पाठवलेल्या नोटिसची भाषा अधिक सोपी आणि सरळ बनवण्याचं तसंच नोटीस

पाठवण्याच्या कारणाचं स्पष्टीकरण देखील देण्यात यावं, असं आवाहन अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्राप्तीकर विभागाला केलं आहे. त्या काल नवी दिल्लीत प्राप्तीकराच्या १६५ व्या वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. ७२ टक्के करदात्यांनी जुन्या कर प्रणालीऐवजी नवीन कर प्रणालीचा स्वीकार केला असून करप्रणाली चेहराविरहित असल्यानं करदात्यांचा विश्वास संपादन केला आहे, असंही निर्मला सीतारामन यावेळी म्हणाल्या.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात बदलापूर, आणि घाटकोपर मध्ये शालेय विद्यार्थ्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला. त्यानुसार सर्व शाळांसाठी येत्या एक महिन्यात मोक्याच्या ठिकाणी पुरेशा संख्येनं सीसीटीव्ही कॅमेरे बसवणं बंधनकारक राहील. कंत्राटी पद्धतीनं कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना शाळांना अत्यंत दक्ष राहण्याचे आणि योग्य प्रक्रियेनंतर पोलिसांकडून त्यांची पडताळणी करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसंच विशाखा मार्गदर्शक तत्त्वांच्या धर्तीवर शाळांनी आठवडाभरात 'विद्यार्थी सुरक्षा समित्या' स्थापन करायच्या आहेत.

**<><><><><><>**

येत्या २४ ऑगस्ट रोजी महाविकास आघाडीनं महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या बंदमागे कोणतंही राजकारण नसून महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी या बंदचं आवाहन केलं आहे, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज स्पष्ट केलं. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. शाळेत जर मुली सुरक्षित नसतील तर

मुलगी शिकली प्रगती झाली म्हणण्यात अर्थ नाही. आधी बहीण सुरक्षित असेल तर पुढे लाडकी बहीण वगैरे योजना राबवता येतील, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. परीक्षेची नवी तारीख लवकराचं जाहीर करण्यात येईल असं आयोगानं समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात देशातल्या नामवंत शास्त्रज्ञांना २०२४ सालचे 'राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार' प्रदान केले. प्रा. गोविंदराजन पद्मनाभन यांना यावेळी 'विज्ञानरत्न २०२४' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. डॉ. आनंदरामकृष्णन यांना कृषी विज्ञान क्षेत्राचा विज्ञान श्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबईतल्या भाभा अणु संशोधन केंद्रातले डॉ. आवेश कुमार त्यागी यांना अणुऊर्जा क्षेत्रातल्या विज्ञान श्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. पुण्यामधल्या भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतले प्रा. जयंत उदगावकर यांना राष्ट्रपतींच्या हस्ते जीवशास्त्रातला विज्ञान श्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><><><>**

आंध्रप्रदेशातील अनकापल्ली जिल्ह्यातल्या अच्युतापुरम सेझमधल्या औषध निर्माण कंपनीत काल झालेल्या अणुभट्टी स्फोटात आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला असून २० हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु,

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी स्फोटात मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांबद्दल सहवेदना व्यक्त केली आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीमधून प्रत्येकी दोन लाख रूपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रूपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><><>**

त्रिपुरात सतत होणाऱ्या पावसामुळं राज्यातल्या अनेक भागांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून भारतीय हवामान विभागानं आजही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. गोमती आणि मुहुरी या मुख्य नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असल्यानं शेकडो हेक्टर क्षेत्रावरल्या पिकांची नासाडी झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला.

**<><><><><><>**

जॉर्डन इथं झालेल्या १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या ग्रेको रोमन प्रकारात ११० किलो गटात भारतीय कुस्तीपटू रोनक दहियानं काल कांस्यपदक जिंकलं. त्यानं तुर्कीच्या इमरुल्ला कॅपकानचा ६-१ असा पराभव केला. तर ५१ किलो गटात साईनाथ पारधीनेही कांस्यपदक मिळवलं आहे.

**<><><><><><>**

हमास संघटनेसोबतच्या संभाव्य युद्धविरामाच्या पार्श्वभूमीवर इस्रायल गाझा पट्टीतून सैन्य माघारी घेणार असल्याचं वृत्त इस्रायलच्या प्रधानमंत्री कार्यालयानं फेटाळलं आहे. इस्रायल फिलाडेल्फी कॉरिडोरमधून लष्कर माघारी घेण्यासाठी

बेंजामीन नेत्यान्याहू तयार असल्याचं वक्तव्य अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन यांनी सोमवारी केलं होतं. त्यानंतर नेत्यान्याहू यांच्या कार्यालयानं हे स्पष्टीकरण दिलं आहे.

**<><><><><><>**

देशाच्या पूर्व, पश्चिम, वायव्य आणि मध्य भागात पुढले ४ दिवस अती जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर पुढले ७ दिवस दक्षिण द्वीपकल्पात काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकण, गोवा, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, आणि गुजरातमध्ये येत्या २६ ऑगस्टपर्यंत, तर आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये पुढले ५ दिवस जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

**<><><><><><>**

जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सतीश कुमार करुणाकरनने काल योकोहामा इथं पुरुष एकेरीच्या सोळाव्या फेरीत प्रवेश केला. आज सतीशचा सामना जागतिक क्रमवारीत चाळीसाव्या स्थानावर असलेल्या थायलंडच्या कांताफोन वांगचारोएन याच्याशी होईल. भारताच्या किरण जॉर्ज याला मात्र पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत जपानच्या कांता त्सुनेयामाकडून २१-१९, २१-१४ असा पराभव पत्करावा लागला. मिश्र दुहेरीत बी. सुमीत रेड्डी आणि एन. सिक्की रेड्डी या भारतीय जोडीला दुखापतीमुळे माघार घ्यावी लागली. ऋतुपर्णा पांडा आणि श्वेतपर्णा पांडा यांचाही महिला दुहेरी प्रकारात डेन्मार्कच्या ज्युली फिन इप्सेन आणि माई सरो या जोडीनं पराभव केला.

**//<><><><><><>//**